# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.07.2025** **वार-मंगळवार**

---

**अण्णाभाऊ साठे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संज्ञापन आणि वृत्तपत्र विभाग, अण्णा भाऊ साठे अध्यासन आणि मातंग साहित्य परिषदेनं विद्यापीठात लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांवर एका परिषदेचं आयोजन आज केलं होतं. हे सर्व थोर नेते स्वातंत्र्य आणि समतेचे पुजारी आहेत; महापुरुषांना जात धर्म देश यांच्या सीमा नसतात; ते सकल मानव जातीच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित करतात, असं प्रतिपादन साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी यावेळी केलं.

**रेव्हपार्टी-एकनाथ खडसे**

पुणे रेव्ह पार्टी प्रकरणात पुणे पोलिसांच्या विरोधात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचं माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत जाहीर केलं. पोलिस यंत्रणेवर विविध प्रश्नचिन्ह उपस्थित करत खडसेंनी संताप व्यक्त केला.

**रेव्हपार्टी**

दरम्यान पुणे रेव्ह पार्टी प्रकरणात पोलिसांची कारवाई पारदर्शक पद्धतीनं, नियमानुसार सुरू आहे, असं पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं. या प्रकरणी झालेल्या कारवाईची विस्तृत माहिती प्रसार माध्यमांना देण्यात आली आहे. पुणे पोलिसांच्या भूमिकेवर संशय घेण्याचं कारण नाही, असं ते म्हणाले.

**पुरवणी परीक्षा निकाल**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे यावर्षी जून आणि जुलै महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल आज मंडळाने जाहीर केला. दहावीच्या पुरवणी परीक्षेत 36 पूर्णांक 48 टक्के आणि बारावीच्या परीक्षेत 43 पूर्णांक 65 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून संबंधित निकालाची प्रत घेता येणार आहे.

**लम्पी**

पुणे जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. आतापर्यंत 906 जनावरांना या रोगाची लागण झाली; यातील 591 जनावरे औषधोपचाराने बरी झाली असून 15 जनावरांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यामध्ये सध्या 300 जनावरांवर उपचार सुरू आहेत. जिल्ह्यातील 5 लाख 70 हजार 791 जनावरांना प्रतिबंधक लस देण्यात आली असून सुमारे 60 टक्के लसीकरण पूर्ण झालं असल्याचं पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. अंकुश परिहार यांनी सांगितलं.

**महावितरण**

ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा द्यावा; तसंच वाढती थकबाकी कमी करण्यासाठी वीज बिलांच्या वसुलीला आणखी वेग द्यावा अशा सूचना महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले. पुणे, कोल्हापूर, बारामती परिमंडलाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**वृक्षारोपण**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने 'ईको क्लब फॉर मिशन' या उपक्रमाअंतर्गत वृक्षारोपण मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचा पहिला कार्यक्रम आज तळजाई पठारावर पार पडला. यावेळी 250 झाडांची लागवड करण्यात आली.

**आपत्ती व्यवस्थापन**

पुण्यातील सिंहगड रस्ता भागातील एकतानगर, विठ्ठलनगर, निंबजनगर इथल्या इमारती आणि वस्त्यांचं पुरापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने वडगांव ते राजाराम पूल या भागात नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी आपत्ती व्यवस्थापन निधीमधून 300 कोटी रूपये दयावे अशी मागणी पुणे महापालिका आयुक्तांनी राज्य सरकारकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी 26 जुन रोजी राज्याच्या नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठवला आहे. मात्र त्यासाठीचा निधी महापालिकेला अदयाप मिळालेला नाही.

**नीलम गोऱ्हे**

पिंपरी चिंचवड शहरातील पिंची या महिला गटाच्या समूहाने मंगळागौर आणि नागपंचमी स्नेहमेळावा आयोजित केला होता. पारंपरिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर उपस्थित होत्या. पारंपरिक फुगड्या, झिम्मा, उखाणे, लोकनृत्य आणि गाण्यांनी सजलेल्या या मेळाव्यात जवळपास एक हजार महिलांनी भाग घेतला.

**श्रीयाळ राजा**

औटघटकेचा राजा म्हणून ओळख असलेल्या श्री श्रियाळशेठ राजा यांचा उत्सव आज पुण्यात धार्मिक आणि पारंपारिक पद्धतीने साजरा होत आहे. रास्ता पेठेतील श्रियाळशेठ चौकात साजऱ्या होत असलेल्या या उत्सवाचं यंदाचं 391वं वर्ष आहे.

**तायक्वांदो**

कनिष्ठ आणि वरिष्ठ गटाची राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धा नाशिकमध्ये नुकतीच झाली. या स्पर्धेत 60 खेळाडूंचा समावेश असलेला पुणे जिल्ह्याचा संघ सहभागी झाला होता. यामध्ये 29 खेळाडूंनी पदकं पटकावली. स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. उद्याही शहरात हलक्या पावसाचा अंदाज असून घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**